# कोणत्याही क्षणी जयदत क्षीरसागराना सत्तेच्या पक्षाची उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता?सुत्र

MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक – दिपक थोरात



किल्ले धारूर ।प्रतिनिधी

पत्रकार सर्वसामान्यांच्या बातम्यांना शासन व प्रशासन दरबारी मांडून त्यांना न्याय देण्याचे काम करतो. मात्र पत्रकारांना अनेक अडचणीचा सामना करावा लागतो विशेष म्हणजे त्यांची आर्थिक बाजू सक्षम नसल्यामुळे त्यांचे आर्थिक स्त्रोत वाढले पाहिजेत. तसेच ६० वर्षानंतर पत्रकारांना किमान व्यवस्थित जगता यावे यासाठी पेन्शन मिळणे आवश्यक आहे. मात्र त्यासाठी जाचक अटी लादल्या असून त्या अटी शिथिल करण्यात याव्यात अशी मागणी व्हाईस ऑफ मीडियाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष विजय चोरडिया यांनी केली, दरम्यान शिर्डी येथे ३१ ऑगस्ट व १ सप्टेंबर असे दोन दिवशीय होणाऱ्या पत्रकारांच्या अधिवेशनास सर्व पत्रकारांनी उपस्थित रहावे असे आवाहन धारूर येथील बैठकीमध्ये त्यांनी केले. यावेळी व्हाईस ऑफ मीडिया धारूर तालुका पदाधिकारी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –३१९ | रविवार दि.११ ऑगस्ट २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -319 | SUNDAY DT.11 AUGUST 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# बीड विधानसभेमध्ये जयदत्त क्षीरसागरांना प्रतिसाद मिळू लागला की 'त्या' विरोधकांची कोल्हेकुई सुरु?

- आमदारकी सत्ता नसताना कोणत्याही पक्षात नसताना सुद्धा जयंदत अण्णांनी कोट्यावधी रुपयाचा निधी बीडकरासाठी आणला.
- महाराष्ट्राच्या नवे तर भारताच्या राजकारणात ओबीसी नेते म्हणून जयदत्त क्षीरसागरनाकडे पाहिले जाते
- काही नेत्यांना असं वाटतं की आम्हीच आता बीड जिल्हा चालू पण जयदत्त क्षीरसागरासारखं पालकमंत्री पद चालवणारा इज्जतदार नेता होणे शक्य नाही
- महाराष्ट्रातील राजकारणामध्ये मोठी पकड असलेला नेता जयदत्त क्षीरसागर
- कोणत्याही मंत्रालयात मंत्रालयीन विभागामध्ये गेल्यानंतर संबंधित सचिव व मंत्री उभा राहून खुर्ची देतात जयदत्त अण्णांच्या शब्दाला मान सर्वच राजकीय पक्षाच्या मंत्री मंडळाकडून





जयदत्त अण्णा म्हणजे दूरदृष्टी नेतृत्व
जयदत्त क्षीरसागर यांच्या बीड विधानसभेतील दौऱ्यामध्ये १८ पगड जातीचा जाहीर पाठिंबा मिळाल्याने काही जणांच्या बुडाला लागली आग
बीड विधानसभेसह जिल्ह्यातील असं कोणतं गाव नाही की त्या गावातल्या सर्व जाती धर्माच्या लोकांना जयदत्तअण्णांनी मदत केली नाही
जुने निष्ठावंत कार्यकर्ते जयदत्त क्षीरसागरण सोबतच
जुना निष्ठावंत मतदारसंघ व त्यातील मतदार बंधू–भगिनी जयदत्त अण्णांच्या नावाने भावनिक साथ
जयदत अण्णा नामही काफी है' जनता व्यक्त करू लागली विश्वास
लोकनेत्याच्या दौऱ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

मागील काही दिवसांपासून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा ग्रामीण भागातील दौरा हा सर्वानि महत्त्वपूर्ण मानला जात आहे. जयदत्त क्षीरसागर यांनी त्यांच्या राजकीय वाटचालीत केलेल्या कामामुळे ग्रामीण भागात आजही जनता समाधानी आहे. याचा प्रत्यय मागील काही दिवसांपासून येत आहे आणि त्याचे कारण म्हणजे जयदत्त अण्णा क्षीरसागर यांनी सुरू केलेल्या भेटीगाठी. ग्रामीण आणि शहरी भागातील ज्या समस्या मागील काही वर्षात सुटू शकल्या नाहीत त्या सर्व समस्या

केवळ जयदत्त अण्णाच सोडू शकतात असा विश्वास जनता व्यक्त करत आहे आणि त्यामुळेच ' जयदत अण्णा बस नाम हि काफी है' असा नारा सध्या कानावर पडत आहे. बीड लोकसभा निवडणुकीदरम्यान बीडमधील राजकीय, सामाजिक वातावरण ढवळून निघाले होते. त्याचे सामाजिक पडसाद अजूनही अनेक ठिकाणी उमटत आहेत. या पार्श्वभूमीवर माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी आता संपर्क दौऱ्याला सुरुवात केली आहे. ग्रामीण भागात जाऊन नव्या जुन्या कार्यकर्त्यांच्या एक निष्ठेला फळ आणि जयदत्त अण्णाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहण्यामध्ये बीड जिल्ह्यातील जनतेसह कार्यकर्ते जयदत्त अण्णांना पाठिंबा देऊन बीडचा आमदार २०२४तास जयदत्त क्षीरसागर यांनाच करणार असल्याचे भावना व्यक्त करत आहेत. माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी बीडविधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने बीड मतदारसंघात संपर्क दौरा सुरु केला आहे. मागच्या दोन दिवसात त्यांनी रायमोहा, लिंबागणेश आदी गटांमधील सुमारे २९ गावांना भेटी दिल्याआहेत. गेल्या महिनाभरात प्रत्येक सर्कल त्यांनी पिंजून काढला आहे, आतापर्यंत त्यांनी २०० गावांना भेटी दिल्या आहेत, आजच्या या दौऱ्यामध्ये ते नव्या जुन्या कार्यकर्त्यांसोबत संवाद साधत आहेत. त्यांच्या संपर्क दौऱ्याल उत्तम प्रतिसाद मिळत असून काही गावांमध्ये तर त्यांचे डफडे वाजवून स्वागत होत असल्याचे चित्र आहे.

पालकमंत्री पद जेव्हा देतांना जयदत्त अण्णा क्षीरसागर यांनी भूषवले होते तेव्हा पालकमंत्री पद चालू असताना स्वच्छ प्रतिमेचा पालकमंत्री म्हणून जयदत्त क्षीरसागर यांच्याकडे पाहिले जाते जयदत्त अण्णांनी त्यांच्या पालकमंत्री कार्यकाळामध्ये सर्वपक्षीय आमदारांना वेगवेगळ्या गावातील मतदार संघातील विकासासाठी समान निधी दिलेला आहे. यावेळी जयदत्त अण्णांनी कधीही भेदभाव केला नव्हता म्हणून जयदत्त क्षीरसागर यांनी आजही बीड जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये जयदत्त अण्णा क्षीरसागर यांची लोकनेता म्हणून ओळख आहे.

# परळीजवळ मोठी दुर्घटना: मलकापुर शिवारात रेल्वेने एका मेंढपाळासह २२ मेंढ्या २ गुरे ठार



परळी / प्रतिनिधी

**परळी वैजनाथ पासून अगदी जवळच असलेल्या मलकापूर शिवारात मोठी भीषण दुर्घटना घडली असुन २२ मेंढ्या, दोन गुरे व एका मेंढपाळाचा या दुर्घटनेत रेल्वेखाली आल्याने मृत्यू झाल्याची घटना सकाळी १० वा. घडली आहे. या घटनेने परळी व परिसरात एकच खळबळ उडाली आहे.**

परळी शहरातील धनगर गल्ली येथील मधुकर सरवदे व मुंजा मुक्तीराम डोणे रा.उखळी,ह.मु.परळी हे दोघे रेल्वे पटरीने मेंढ्या चारण्यासाठी जात होते. रविवार दि.११ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता आपल्या मेंढ्या चारण्यासाठी परळी–हैद्राबाद रेल्वे पटरीच्या कडेने जात असताना मलकापुर शिवारात समोरुन आलेल्या मालगाडीने मेंढ्या,दोन जनावरांना चिरडले.दोन्ही बाजुने डोंगर असल्याने बचावासाठी वेळच मिळाला नसल्याने मेंढपाळ मुंजा डोणे हे देखील या दुर्घटनेत सापडुन ठार झाले.या दुर्घटनेत सरवदे यांच्या २२ मेंढ्या व दोन जनावरे मृत्युमुखी पडले आहेत.

### राज ठाकरेंवर सुपाऱ्या फेकणारे आमचे कार्यकर्ते पण ती पक्षाची भूमिका नाही

मुंबई – बीडमध्ये मनसे प्रमुख राज ठाकरेंच्या गाडीवर सुपाऱ्या फेकण्यात आल्या. या आंदोलनात शिवसेनेचे कार्यकर्ते असतील, पण त्या आंदोलनाशी पक्षाचा संबंध नाही असं शिवसेना उद्धव बाळासाहेबव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटलंय. मात्र मनसेने आम्हाला इशारे वगैरे देऊ नये असंही त्यांनी सुनावले आहे. महाराष्ट्राच्या गादीवर लोटांगणवीर बसले आहेत, असे म्हणत राऊतांनी टीका केली आहे. राऊत मुंबईत माध्यमांशी बोलत होते. संजय राऊत म्हणाले, मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या गाडीवर काही जणांनी सुपारी फेकल्या त्यामध्ये शिवसेनेचे पदाधिकारी असू शकतात . पण त्या आंदोलनाशी शिवसेनेचा पक्ष म्हणून संबंध नाही. मराठा कार्यकर्त्यांचे आरक्षणासंदर्भातील ते आंदोलन होते. सध्या महाराष्ट्रात विशेषतः मराठवाडा आणि बीडमध्ये जे आंदोलन सुरू आहे. त्यात राज ठाकरे यांनी एक वक्तव्य केले. त्या वक्तव्यानंतर सर्वच पक्षातील तरुण मराठा कार्यकर्त्यांनी निषेध व्यक्त केला. त्यात मनसेचे लोकही असू शकतात. कारण मराठा आंदोलन हे पक्षविरहीत आंदोलन आहे.

# ज्ञानराधा घोटाळा प्रकरण:पतसंस्था कार्यालय, उपाध्यक्षांच्या घरावर ईडीचे छापे

## कागदपत्रे जप्त, मनी लाँड्रिंग केल्याने ईडीची एंट्री

बीड /प्रतिनिधी

ज्ञानराधा पतसंस्थेतून मोठ्याप्रमाणावर मनी लाँड्रिंग झाल्याचासंशय असून यासाठी मुंबईच्या ८ अधिकाऱ्यांच्या पथकाने शुक्रवारी बीडमध्ये ज्ञानराधा पतसंस्थेचे जालना रोडवरील मुख्य कार्यालय, पतसंस्थेचे उपाध्यक्ष यशवंत कुलकर्णी यांचे घर,सुरेश कुटे यांचे घर, त्यांचे कापड दुकान या ठिकाणी तपासणी केली. अतिरिक्त संचालक दर्जाचे अधिकारीत्यांचे प्रमुख होते. इतर ठिकाणांहूनत्यांच्या हाती काही लागले नाही. मात्रपतसंस्थेच्या मुख्य शाखेतीलसंगणकातून पतसंस्थेचे खातेदार, ठेवी,ठेवीदारांची संख्या यासह इतर काहीमाहिती मिळाली आहे.



ज्ञानराधा मल्टिस्टेट पतसंस्थेच्या घोटाळा प्रकरणातआता सक्तवसुली संचालनालयाची (ईडी) एंट्री झालीआहे. ज्ञानराधाच्या माध्यमातून मनी लाँड्रिंग झाल्यानेईडीने शुक्रवारी सायंकाळी बीडमध्ये ज्ञानराधामल्टिस्टेटचे मुख्य कार्यालय, उपाध्यक्ष यशवंतकुलकर्णी यांचे घर व सुरेश कुटे यांच्या घर, दुकानावरछापेमारी करून तपासणी केली. ८ अधिकाऱ्यांच्यापथकाने सुमारे पाच तास तपासणी करून मुख्य शाखेतूनज्ञानराधातील खातेदार, ठेवी, ठेवीदार याबाबतचीमाहिती त्यांनी घेतली आहे. बीडच्या आर्थिक गुन्हेशाखेची यासाठी मदत घेतली गेली.

बीड येथील कुटे ग्रुपवर नोव्हेंबर २०२३ मध्ये प्राप्तिकरविभागाने केलेल्या छापेमारीनंतर कुटे ग्रुपचे प्रमुख सुरेशकुटे अध्यक्ष असलेल्या ज्ञानराधा मल्टिस्टेट पतसंस्थेतठेवी काढण्यासाठी ठेवीदारांनी गर्दी केली होती. यामुळे पतसंस्था आर्थिक अडचणीत आली होती. ९ महिने ठेवीदारांनी पैसे परत मिळण्याची वाट पाहिली. मात्र कुटे यांनी केवळ आश्वासने दिली. अखेर ठेवीदारांनी न्यायालयात धाव घेऊन तक्रार दिल्यानंतर गुन्हे नोंदझाले. बीड जिल्ह्यातच ज्ञानराधा पतसंस्था प्रकरणातसुमारे ४१ गुन्हे नोंद आहेत, तर छत्रपती संभाजीनगर, जालना जिल्ह्यातही गुन्हे नोंद आहेत. आर्थिक गुन्हेशाखेकडून याचा तपास केला जात आहे. दरम्यान, आतायात सक्तवसुली संचालनालयानेही कारवाई सुरू केली.

ज्ञानराधा पतसंस्थेच्या राज्यात ५२ शाखा असून बीड जिल्ह्यात २२ शाखाआहेत. ज्ञानराधाप्रकरणी बीड जिल्ह्यात ४१ गुन्हे नोंद आहेत.

# ज्ञानराधा मल्टीस्टेट ठेविदारांचा प्रश्न मार्गी लावण्याची राज ठाकरे यांच्याकडे वर्षाताई जगदाळे यांची मागणी

बीड । प्रतिनिधी

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेत हजारो ठेवीदारांचे कोट्यावधी रुपये अडकले आहेत. मनसेने वेळोवेळी या विरोधात आंदोलन केलेली आहे. बीड येथे संघर्ष यात्रा निमित्त मनसे प्रमुख राज ठाकरे आले असता त्यांच्यासोबत ज्ञानराधा मल्टीस्टेट संदर्भात चर्चा करत ठेविदारांची अडकलेली ठेवी परत मिळून देण्यासाठी मुख्यमंत्री व अर्थमंत्री यांच्याशी चर्चा करत प्रश्न मार्गी लावण्या संदर्भात मनसेच्या महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्याशी चर्चा केली.



ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह बँक घोटाळा जिल्ह्याला आर्थिक संकटात टाकणारा ठरला. मागील आठ महिन्यापासून हक्काच्या ठेवीसाठी ठेवीदार दारोदार फिरत आहेत. ज्ञानराधाचे प्रमुख सध्या जेलची हवा खात आहे .त्यांच्यावर जिल्हाभरात अनेक गुन्हा दाखल झालेले आहेत परंतु ठेवीदारांना त्यांच्या हक्काच्या ठेवी कधी परत मिळणार याची निश्चिती सांगता येत नाही. इडी कडून ज्ञानराधाच्या सर्व संपत्तीवर टाच आणला जात आहे. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी थेट संवाद साधत बीड मधील ज्ञानराधा मल्टीस्टेट प्रकरणात लक्ष घालून मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी चर्चा करावी यासाठी मनसेच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी राज ठाकरे यांच्याशी ज्ञानराधा मल्टीस्टेट प्रश्नावर व्यापक चर्चा करत सत्य परिस्थिती समोर मांडली. ज्ञानराधा मल्टीस्टेट विरोधात जागरण गोंधळ, आंदोलन तथा मोर्चे उपोषण मनसेच्या वतीने करण्यात आलेली आहे सामान्य ठेविदारासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना सदैव रस्त्यावर उतरत असल्याने ठेवीदारांना राज ठाकरे व मनसे कडून अपेक्षा निर्माण झाल्या आहेत.

## माजलगाव पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे - पांडुरंग उगले

माजलगाव । प्रतिनिधी

मागच्या पंचवीस वर्षा पासूनच्या पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या न्याय मागण्यांसाठी वैशालीताई राणे यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या आझाद मैदान मुंबई येथील बेमुदत आंदोलनात माजलगाव तालुक्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान माजलगाव तालुका अध्यक्ष पांडुरंग उगले यांनी केले आहे दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी बेमुदत आंदोलन, आझाद मैदान, मुंबई येथे संघटना च्या वतीने व वैशाली ताई राणे , भारती साळवी ,इक्बाल शेख व संजय पांडे यांच्या नेतृत्वाखाली बेमुदत आंदोलन करन्यात येणार आहे.महाराष्ट्र राज्य पदवीधर अंशकालीन कर्मचारी मागील २५ वर्षापासून त्यांच्या मागण्यांबाबत वेळोवेळी आंदोलन, आमरण उपोषण इ. संघटनेमार्फत केले असून आजपर्यंत निर्णय मार्गी लागलेला नाही. आम्हाला तात्काळ कायमस्वरुपी सेवेत घेण्याच्या प्रश्नाला न्याय द्यावा, या साठी महाराष्ट्र राज्यातील सर्व पदवीधर अंशकालीन कर्मचारी दिनांक १३.ऑगस्ट २०२४ पासून आझाद मैदान, मुंबई येथे बेमुदत आंदोलनाचा इशारा लेखी निवेदनातुन दिला आहे तरी माजलगाव तालुक्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचारी बंधूनी जास्तीत जास्त संख्येने या आंदोलनात सहभागी व्हावे असे आव्हान तालुका अध्यक्ष पांडुरंग उगले ( मो न ९४२००१८४५६ ) यांनी केले आहे



# शिक्षक समन्वय संघाचा १६ ऑगस्ट पासून शिक्षकांच्या मागण्यांसाठी हुंकार

## प्रचंड संख्येने सहभागी होऊन सरकारच्या दारात करणार हुंकार

मुंबई: राज्यातील खाजगी प्राथमिक,माध्यमिक,उच्चमाध्यमिक व वर्गतुकड्यांतील ६५ हजार विना तथा अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शासननिर्णय १५ नोव्हेंबर २०१५ व ०४ जून २०१४ मधील वेतन अनुदान वितरणाचे सुत्र लागू करत या शाळांना १ जानेवारी २४ पासून विनाअट टप्पा वाढ लागू करणे, शासनाच्या चुकीमुळे १२,१५ व २४ फेब्रुवारी २१ च्या शासननिर्णयान्वये शासन स्तरावर त्रुटी पात्र ठरलेल्या शाळांना निधीसह समान टप्पावाढ लागू करणे यासह इतर मागण्या साठी शिक्षक समन्वय संघावतीने मुंबईतील आझाद मैदानावर १६ ऑगस्ट २४ पासून हुंकार बेमुदत आंदोलन पुकारण्यात आले आहे.

राज्यातील 'कायम' शब्द काढलेल्या प्राथमिक,माध्यमिक,उच्च माध्यमिक व वर्गतुकड्यावर सुमारे ६५ हजार शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी 'पंधरा ते वीस' वर्षां पासून काही 'विनावेतन' तर काही तुटपुंज्या वेतनावर काम करत आहेत. महाराष्ट्राच्या महान शैक्षणिक परंपरेचा हा अपमान आहे. शिक्षक दिनी शिक्षकांना देशाचे शिल्पकार,आधारस्तंभ म्हणायचे आणि त्यांच्या सेवेला वीस-वीस वर्षे झाली तरी विनावेतन राबवून घ्यायचे.एव्हढ्या प्रचंड कालावधीत विनावेतन आणि तुटपुंज्या वेतनावर काम करत असताना हे शिक्षक आपला उदरनिर्वाह कसा करत असतील याची जराही संवेदना राज्यकर्त्यांना नाही,या वेदना शासनापर्यंत पोहचवण्यासाठी शिक्षक समन्वय संघाच्यावतीने येत्या १६ ऑगस्ट पासून शासनाच्या दारी बेमुदत धरणे करण्यात येणार आहे.

प्राथमिक,माध्यमिक,उच्चमाध् मिक व वर्ग तुकड्यांना मुल्यांकन वेळी ठरवलेल्या वेतन अनुदान वितरणाच्या सुत्राप्रमाणे पूर्ण वेतनाचा शासननिर्णय, शासनाच्या चुकीमुळे १२,१५ व २४ या शासननिर्णयान्वये ३० दिवसाच्या आत शासनस्तरावर त्रुटी पात्र ठरलेल्या शाळांना निधीसह समान टप्पावाढ ,पुणे स्तरावरील अघोषित शाळांना अनुदानास पात्र ठरवत वेतन अनुदान मंजूर करणे,२०१८-१९ मध्ये पटसंख्येच्या अटींमुळे टप्पा वाढीत पासून वंचित असल्यालेल्या शाळांना टप्पा वाढ करणे यासह अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत शिक्षक समन्वय संघाचे आंदोलन मागे घेण्यात येणार नाही.अशी भूमिका शिक्षक समन्वय संघाच्या वतीने शासनास दिलेल्या निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे.

ज्या शासननिर्णयानुसार मूल्यांकन झाले त्याच शासननिर्णयातील वेतन वितरणाचे सुत्र रद्द करून ६५ हजार शिक्षकांवर उपासमारीची १९ सप्टेंबर २०१६ च्या शासननिर्णयाच्या माध्यमातून वेळ आणली गेली.उपरोक्त मागणीतील वेतन अनुदान वितरणाचे सुत्र लागू केल्यास राज्यातील अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांना पुढील पूर्ण वेतन मिळण्यातील अडचण दूर होईल.विधिमंडळात कसलीही चर्चा न करता लाडक्या बहिणीसाठी योजना आणता पण अंशतःअनुदानीत शाळेतील शिक्षिका असलेल्या लाडक्या बहिणीना वेतधापासून वंचित ठेवले जाते अशी दुटप्पी भूमिका घेणं कितपत योग्य आहे.स्वत:चे वेतन आणि भत्ते वाढवणारे राज्यकर्ते शिक्षकांना वेतन देण्यासाठी पैसे नाही म्हणतात,ही न पटणारी बाब आहे.पुन्हा एकदा मुंबईतील आझाद मैदानावर याच मागणीसाठी शिक्षक बेमुदत आंदोलन सुरू करण्यात येणार आहे.





त्यामुळे शिक्षकांच्या सहनशीलतेचा अंत न पहाता ज्या शासननिर्णयाने मूल्यांकन केले त्याच शासननिर्णयातील वेतन अनुदान वितरणाचे सुत्र लागू करून १०० टक्के अनुदान देवून शिक्षकांची वेठबिगारी थांबवावी अशी मागणी शिक्षक समन्वय संघाने निवेदनाद्वारे राज्याचे मुख्यमंत्री,अर्थमंत्री आणि शालेय शिक्षणमंत्री यांना सादर करण्यात आले आहे.अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी आझाद मैदानावरील आंदोलनात प्रचंड संख्येने सहभागी झाले पाहिजे.जोपर्यंत मागण्या मान्य होणार नाही अर्थात मागण्या पूर्ण झाल्याचा शासननिर्णयाचा (कागद) निर्गमित होणार तोपर्यंत शिक्षक समन्वय संघ आझाद मैदान,मुंबई सोडणार नाही असे आवाहन शिक्षक समन्वय संघाच्या वतीने प्रा.राहुल कांबळे,के.पी.पाटील,सौ.नेहाताई गवळी,प्रा.संतोष वाघ,प्रा.दिपक कुलकर्णी,यांसह हजारो शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी होणार आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराज स्मारक उभारण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केले धरणे आंदोलन

गेवराई ।प्रतिनिधी

दि ९ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती च्या वतीने स्मारक उभारण्यासाठी च्या कामातील अडथळा दूर करण्यासाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालया समोर धरणे आंदोलन करण्यात आले . गेवराई शहरात छत्रपती चौकात स.न ५८ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज स्मारक व्हावं अशी मागणी मागील दोन वर्षांपासून गेवराई शहर व तालुक्यातील जनता शासनाकडे करीत आहेत.परंतू प्रस्तावित जागेवर भूमाफियांनी दावा केल्याने त्यांच्या दबावाखाली शासन रितसर परवानगी दिली नाही.रितसर परवानगी तात्काळ द्यावी, भूमाफिया वर एम पी डी ए अंतर्गत कारवाई करावी, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक उभारण्यासाठी उशीर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी इत्यादी मागण्यांसाठी धरणे आंदोलन करण्यात आले.आंदोलनाला शिव संग्राम, भारतीय मराठा महासंघ,अखिल भारतीय मराठा महासंघ, राष्ट्रीय जावा संघटना,पँथर्स रिपब्लिकन पार्टी,अ.भा.भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समिती,सकल जैन समाज गेवराई, स्वाभिमानी शेतकरी संघटना,शिवभक्तांची युवा परिषद, डॉक्टर संघटना यांनी जाहीर पाठिंबा देवून आंदोलनात सक्रिय सहभागी होण्याचा इशारा दिला.त्याच बरोबर आंदोलनात छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती चे अध्यक्ष ड संजय काळे, उपाध्यक्ष श्यामराव गायकवाड पाटील, सचिव कैलास राव माने, डॉ अनिल दाभाडे, विलास खिसाडे, विनोद अप्पा इंगोले, शिवाजी राव सोळुंके,ड



अंबादास राव जाधव, सुशीलकुमार टकले, शिरीष भोसले, गणेश निकम, शर्मिला शेळके, ज्योती ताई आजबे, शाहीन पठाण मॅडम,प्रभाकर भालशंकर,कवळे,लांडगे, डॉ अशोकराव धुमाळ, बापुसाहेब जाधव,,कुलदीप करपे, संजय सगळे पाटील, सुभाष भैय्या सावंत, भालचंद्र तिकीट, भाऊराव प्रभाळे,लहु गायकवाड यांच्या सह शहरातील, तालुक्यातील मावळे,विविध गावचे सरपंच ,आजी माजी ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक व राजकीय व्यक्ती सह हजारो मावळे आंदोलनात सहभागी झाले होते.त्याच बरोबर डॉ ज्योती ताई मेटे व माजी मंत्री सुरेशराव नवले साहेब, गणेशराव बजगुडे यांनी आंदोलनास प्रत्यक्ष भेटून पाठींबा दिला. आंदोलनकर्त्यांना रात्री ८ वाजता मा. जिल्हाधिकारी अविनाश पाठक साहेब यांनी गेवराई शिवस्मारक समितीच्या पदाधिकाऱ्यांना चर्चा करण्यासाठी त्यांच्या दालनात बोलावून पुढील कार्यवाही सोमवारी करण्याचा शब्द मा जिल्हाधिकारी साहेबांनी दिला. त्यामुळे छत्रपती स्मारक समिती ची पुढील भूमिका सोमवारी सायंकाळी ठरवण्यात येईल असे ठरवण्यात आले. सर्व मावळ्यांनी आंदोलनात शांततेत सहभागी झाल्याबद्दल मावळे आणि पाठबळ देणाऱ्या सर्व संघटना यांचे छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती च्या वतीने शेवटी समारोपप्रसंगी अध्यक्ष ड संजय काशिनाथराव काळे, उपाध्यक्ष शामराव गायकवाड पाटील आणि सचिव कैलासराव माने यांनी आभार मानले.

# सर सय्यद अहेमद खान उर्दू प्राथमिक शाळेत पालक मेळावा संपन्न








बीड: आज दिनांक १०.०८.२०२४ रोजी शनिवार बीड जिल्ह्यातील नामांकित शाळा सर सय्यद अहमद खान सेमी इंग्रजी शाळेत आज इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांचे पालक व शिक्षक यांची बैठक झाली. या वेळी ६०० पालक उपस्थित होते. त्यात कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मौलाना अखिल कासमी साहेब प्रमुख पाहुणे म्हणून मौलाना फरमान सहाब, पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे सचिव मुश्ताक अन्सारी साहेब, अब्दूल वकील सर उपस्थित होते. यावेळी बोलताना अब्दूल वकील सर म्हणाले की पालकांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांनी स्वतः लक्ष द्यावे. सकाळी उठल्या पासून ते रात्री झोपे पर्यंत तो काय काय करतो, किती अभ्यास करतो, कोणत्या मित्राला भेटतोय, त्याच्या आवडीनिवडी कोणत्या आहे, त्याला काय आवडते, त्याला कोणत्या गोष्टीत रुची आहे. याकडे पालकांनी लक्ष द्यावे. शाळा तर विद्यार्थ्यांना अभ्यासात येणार्या अडचणी दूर करतेच. पालकांनी सुद्धा शाळेशी व शिक्षकांशी संवाद साधला पाहिजे. शेवटी मौलाना अखिल सहाब म्हणाले की मुलांना दिन व दुनिया या दोन्ही शिक्षणासाठी सक्ती करावी. पालक मेळाव्याचे सूत्रसंचालन तौसीफ सर यांनी केले व कार्यक्रमाचे आभार इम्रान सर यांनी केले.

# २०२३ च्या कापूस-सोयाबीन अर्थसहाय्यासाठी कृषी सहाय्यकाकडे भरा संमतीपत्र - धनंजय मुंडे



प्रतिहेक्टरी ५ हजारांचे अनुदान; ई-पीक पेरा नोंदणी असणारे सर्व शेतकरी लाभार्थी

आधार संलग्न माहितीसाठी वैयक्तिक संमतीपत्र किंवा सामूहिक नाहरकत देणे आवश्यकमुंबई - सन २०२३ मधील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी पाच हजार रुपये अर्थसहाय्य राज्य शासनाच्या वतीने देण्याचा निर्णय शासन स्तरावर झाला असून ही रक्कम शेतकऱ्यांना वितरित करण्यापूर्वी त्यांच्या आधार व बँक खात्याशी संलग्न असलेल्या माहितीचा वापर करण्यासाठी पात्र असलेल्या लाभार्थी शेतकऱ्यांनी त्यांचे वैयक्तिक संमतीपत्र किंवा सामूहिक नाहरकत पत्र आपल्या गावाशी संबंधित कृषी सहाय्यकाकडे जमा करणे आवश्यक असल्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी सांगितले आहे.

२०२३ च्या खरीप हंगामामध्ये कापूस व सोयाबीन चे भाव पडल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले. मात्र यावर उपाययोजना म्हणून कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून राज्य शासनाने मागील वर्षीच्या सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी पाच हजार रुपये प्रमाणे दोन हेक्टर पर्यंत मदत देण्याची घोषणा केली व त्यानुसार निधी सुद्धा उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर रक्कम सोयाबीन- कापूस उत्पादक असलेल्या व ज्यांनी ई-पीक पेऱ्याची नोंदणी केलेली आहे अशा सर्व शेतकऱ्यांना केली जाणार असून, शेतकऱ्यांचे आधार व बँक खाते संलग्न असलेली माहिती, कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या खात्यांवर रक्कम वर्ग करण्याच्या कामासाठी माहिती हाताळण्यासाठी शेतकऱ्यांनी वैयक्तिक संमतीपत्र किंवा सामूहिक शेती असल्यास सामूहिक नाहरकत प्रमाणपत्र देणे आवश्यक असल्याचे मुंडे यांनी स्पष्ट केले आहे. त्यानुसार पात्र असलेल्या लाभार्थी शेतकऱ्यांनी सदर संमतीपत्र किंवा नाहरकत प्रमाणपत्र आपल्या गावाशी संबंधित असलेल्या कृषी सहाय्यकांकडे तातडीने सादर करावे, जेणेकरून अनुदानाच्या रकमा शेतकऱ्यांना शक्य तितक्या लवकर त्यांच्या संलग्न बँक खात्यांवरती वितरित करता येतील, असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे.



बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक सन्माननीय अविनाश बारगळ साहेब यांनी बीड पोलीस अधीक्षक पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर सत्कार करताना इंजिनिअर सादिक इनामदार व सामाजिक कार्यकर्ते मुसाखान पठाण

# शहर पोलीस स्टेशन आणि विश्व हॉस्पिटल यांचे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

## शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घेण्याचे आयोजकांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

बीड शहर पोलीस स्टेशन आणि विश्व हॉस्पिटल बीड यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यातील सर्व पोलीस बांधव आणि नागरिकांसाठी मेंदू,मनका व नसाचे मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराला जिल्ह्यातील सुप्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकर आणि छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिद्ध न्यूरोलॉजिस्ट डॉ ज्ञानेश्वर देशमुख हे रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन करणार आहेत. शिबिराला प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक श्री अविनाश बारगळ,जिल्हा अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष तथा प्रसिद्ध पोटविकार तज्ञ डॉ अविनाश देशपांडे हे राहणार आहेत शिबिरामध्ये मेंदू, मनका व नस संदर्भातील सर्व विकाराची तपासणी व मार्गदर्शन केले जाणार आहे या शिबिराचे आयोजन विश्व हॉस्पिटल व उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वाम्बर गोल्डे आणि शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांनी केले आहे स्वातंत्र्य दिनानिमित्त होणाऱ्या या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घेण्याचे आवाहन पोलीस अधीक्षक श्री अविनाश बारगळ, शहर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांनी केले आहे.. !

# पठाण अमर जान यांचा मनसेत प्रवेश

बीड / प्रतिनिधी

येथील तरुण पत्रकार तथा समाजसेवक पठाण अमर जान यांनी शहरातील अन्विता हॉटेल या ठिकाणी मनसे प्रमुख श्री राज ठाकरे यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत प्रवेश केला आहे. सविस्तर वृत्त असे की बीड येथील तरुण पत्रकार तथा समाजसेवक पठाण अमर जान यांनी काल हॉटेल अन्विता येथे मनसे मध्ये प्रवेश केला आहे मनसेचे अध्यक्ष श्री राज साहेब ठाकरे यांनी पठाण अमर जान यांना मनसेचा स्कार्फ घालून मनसे मध्ये प्रवेश दिला आहे मनसेचे पक्षनिरीक्षक आणि नाशिक महापालिकेतील मनसे नगरसेवक श्री सलीम मामा शेख यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मनसेचे बीड



जिल्हा उपाध्यक्ष सदाशिव बिडवे यांच्या शिफारशीने अमर जान पठाण यांचा मनसेत प्रवेश झाला आहे.

प्रस्थापित मुस्लिम नेते मुस्लिम समाजातील तरुणांना वेगळ्या मार्गाने घेऊन जात राजकारणापोटी मुस्लिम तरुणांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याने व समाजाच्या शिक्षण,रोजगार व विकासाच्या मुद्द्यावर प्रस्थापित नेते आपले भूमिका मांडत नसल्याने आपण या गोष्टीला विरोध केल्याने मुस्लिम समाजाच्या तथाकथित प्रस्थापित नेत्यांना माझ्यासारख्या सुशिक्षित कार्यकर्त्याची अडचण होत असल्याने आपण महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत प्रवेश करत असल्याचे पठाण अमर जान यांनी म्हटले आहे पठाण यांच्या प्रवेशाच्या वेळी मनसेचे राज्य उपाध्यक्ष अशोक तावरे पक्षनिरीक्षक नरेंद्र तांबोळी मनसे जिल्हाध्यक्ष सुमंत धस वाहतूक सेनेचे राज्य उपाध्यक्ष रवींद्र नेमाणे यांच्यासह असंख्य पदाधिकारी उपस्थित होते.

# अंबाजोगाईतील प्रस्तावित कारागृहासाठी जमिनीचा ताबा देण्याचे शासनाचे आदेश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथे अत्याधुनिक कारागृह निर्मितीच्या प्रक्रीयेला वेग आला असून त्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या हेतूने ३० एकर जमिनीचा कारागृह प्रशासनास आगाऊ ताबा द्यावा असे आदेश राज्य शासनाने दिले आहेत. अंबाजोगाई येथे कारागृह निर्मितीसाठी आ. नमिता मुंदडा यांनी केलेल्या प्रयत्नांना शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला असून यासाठी काळवटी तांडा परिसरातील जागा निश्चित करण्यात आली आहे. अंबाजोगाई येथील पुर्वापार

असलेले उपजिल्हा कारागृह नादुरुस्त इमारतीमुळे बंद करण्यात आल्यानंतर शहर परिसरात आधुनिक कारागृह बांधण्यासाठी मागणी पुढे आली होती. तत्कालीन पालकमंत्री स्व.डॉ. विमल मुंदडा यांच्या कार्यकाळात या संबंधीचा प्रस्ताव राज्याच्या गृह विभागाकडे सादर करण्यात आला होता. या प्रकल्पासाठी अंबाजोगाई शहरानजीक असलेल्या काळवीट तांडा परिसरातील शासकीय जागा उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयात



सादर केला होता. कैद्यांच्या वाढत्या संख्येमुळे बीड येथील जिल्हा कारागृहाबर येणारा ताण आणि अंबाजोगाईसह आजबाजूच्या तालुक्यातील आरोपींचे दररोज होणारे

बीडचे हेलपाटे लक्षात घेता विद्यमान आ. नमिता मुंदडा यांनी अंबाजोगाई कारागृहासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरु ठेवला. त्यांच्या मागणीचे गांभीर्य लक्षात घेत शासनाने अंबाजोगाई येथे कारागृह निर्मितीसाठी सकारात्मकता दर्शविली आणि काळवटी तांडा परिसरातील ३० एकर शासकीय जागा यासाठी निश्चित करण्यात आली. गतवर्षी या जमीनीची मोजणी करण्यात येऊन मोजणी नकाशा देखील तयार झाला. या प्रस्तावित कारागृह बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यासाठी जमिनीचा ताबा कारागृह प्रशासनास मिळणे आवश्यक होते. आ. मुंदडांनी या संदर्भात पाठपुरावा केल्यानंतर मागील आठवड्यात राज्य शासनाने सदरील शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा कारागृह प्रशासनास द्यावेत असे आदेश दिले आहेत. लवकरच जिल्हा स्तरावरून हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण होणार असून आधुनिक कारागृह बांधण्यासाठीचा मार्ग मोकळा होणार आहे. याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आ. पंकजाताई मुंडे, भाजप नेत्या डॉ. प्रितमताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा आभार मानले आहेत.



गेल्या तीन महिन्यापासून बीड शहरातील मोमीन पुरा ,आमेर कॉलोनी ,सौदागर कॉलोनी , मिल्लत नगर भागात नळाला गढूळ पाणी पुरवठा होत होता , पिण्याचे पाणी अस्वच्छ येत असल्याने नागरिकांना विविध साथ रोगांनी घेरले होते ही गंभीर बाब परिसरातील नागरिकांनी समाजसेवक वाजेद जावेद कुरेशी यांना सांगितली असता वाजेद जावेद कुरेशी यांनी माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या माध्यमातून तत्काळ पाणी पुरवठा विभागातील कर्मचारी अधिकारी यांच्याशी संपर्क करून हा विषय निकाली काढला पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागल्याने नागरिकांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते यावेळी परिसरातील सर्व नागरिकांनी समाजसेवक वाजेद जावेद कुरेशी यांचा जाहीर सत्कार करत त्यांच्या या कार्याचे कौतुक केले यावेळी मोमीन मुज्जू,मोमीन आवेज,मोमीन परवेझ, मोमीन खिजर,इनामदार सरफराज, मोमीन मोहसीन,यांच्यासह परिसरातील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# कोटेशन भरुनही विज जोडणी मिळेना शेतकऱ्याचे महावितरण समोर उपोषण सुरु

माजलगाव । प्रतिनिधी

**धारूर तालुक्यातील मुंगी गावचे रत्नाकर भारत शिंदे यांची म्हातारगाव, वाका शिवारावर जमीन आहे विहिरीला भरपूर पाणी असल्यामुळे त्यांनी रीतसर महावितरण कडे २५ हजाराच्या आसपास कोटेशन भरले सिरसाळा महावितरण विभागाकडून सदर वीज जोडणी साठी सर्वे करण्यात आला अवघ्या दोन पूलच्या अंतरावरील जोडणी देण्यासाठी गीते मॅडम यांनी सहा महिने कालावधी पूर्ण करूनही विज जोडणी न दिल्याने वैतागलेल्या शेतकऱ्यांने महावितरणच्या कार्यालयासमोर तीन वेळा उपोषण केले अंबाजोगाई महावितरण कार्यालयासमोर उपोषण करताना तू मारल्यासारखे कर मी रडल्यासारखे करतो असे महावितरण दाखवून देत तात्पुरता एक फुल उभा करून उपोषण स्थगित भाग पडले**

व नंतर काम बंद करण्यात आले असं का केले म्हणून जाब विचारले असता शेतकरी अडवणूक करत आहेत आम्ही काहीच करू शकत नाही असे उडवा उडवी चे उत्तरे दिली गेली मात्र सदर जमिनीवर एका मोठया नेत्याचा सौर ऊर्जा प्रकल्प बनवण्याचा मनोदय आहे हिच जमीन मिळावी म्हणून तेथील शेतकऱ्यात भांडण लावून सदर जमीन पदरात पाडून घेण्या साठी अधिकऱ्या वर दबाव वाढवून शेतकऱ्यांना त्रास दिला जात असल्याचे बोलले जाते आम्ही मरू मात्र वडिलोपार्जित जमिनीवरचा हक्क सोडणार नाही असे सांगत शेतकरी रत्नाकर शिंदे म्हणाले शिंदे



## उपोषणाच्या तिसरा दिवस उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली

महावितरांच्या बीड येथील कार्यालय समोर दि ८/८/२०२४पासून उपोषण करत आहेत मात्र निर्गठ अधिकारी लक्ष देत नसल्याने उपोषण च्या तिसऱ्या दिवशी त्याची प्रकृती खालवली आहे त्या मुळे त्याना सरकारी दवाखान्यात ऍडमिट करण्यात आले आहे मात्र मी उपोषणावर ठामच राहणार असे रत्नाकर शिंदे यांनी सांगितले

# वजन कमी करायचे असेल तर वेलनेस सेंटरची गरज आहे : आ. नमिता मुंदडा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आज प्रत्येक व्यक्तीकडे पैसा आहे परंतु आरोग्य नाही. आपण आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत असताना अनेकांचे खूप मोठ्या प्रमाणात वजन वाढले आहेत. या वाढलेल्या वजनामुळे अनेकांना चालेंज निर्माण होत आहेत. आपले आरोग्य चांगले ठेवायचे असेल तर आशा वेलनेस सेंटर ची गरज आहे योगेश्वरी गोल्डन स्टार वेलनेस सेंटर चे उद्घाटन प्रसंगी आमदार नमिताताई मुंदडा यांनी बोलताना व्यक्त केले. शहरातील माळीनगर परिसरात नव्यानेच सौ आशा नागेश औताडे यांच्या योगेश्वरी गोल्डन स्टार वेलनेस सेंटरची सुरुवात करण्यात आली असून यावेळी सेंटरचे उद्घाटन बीड येथील जागतिक आरोग्य सल्लागार विनोद आघाव सर यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून पुणे येथील जागतिक आरोग्य सल्लागार कृष्णा बांगर सर, माजी आमदार पृथ्वीराज साठे, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, इंडियन मेडिकलचे डॉ. राजेश इंगोले, म.प.प.चे बीड जिल्ह्याचे कार्याध्यक्ष पत्रकार दत्तात्रय आंबेकर, माजी जि.प. सदस्य शंकर अण्णा उबाळे, माझी उपनगराध्यक्ष मनोज लखेरा, डिजिटल मीडिया अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अभिजीत लोमटे, म.प.प.चे तालुकाध्यक्ष प्रशांत प्रदेश सरचिटणीस व्यंकटेश चामनर, टायगर ग्रुप चे स्वप्निल सोनवणे, सा. कार्यकर्ते जीवनराव कराड, संजय गंभीरे, वृक्षमित्र सुधाकर देशमुख यांच्यासह आदींची उपस्थिती होती. यावेळी आ. नमिता ताई बोलताना म्हणाल्या की नागेश औताडे सरांनी चॅनलच्या माध्यमातून अनेकांचे प्रश्न सोडवलेले आहेत. परंतु आता स्वतःचे वजन कमी




करून अशा वेळी वेलनेस सेंटरची सुरुवात करून शहरातील सर्व नागरिकांना या सेंटरचा मोठा फायदा होणार आहे. यावेळी बोलताना डॉ. राजेश इंगोले म्हणाले की अंबाजोगाई शहरात अशा वेलनेस सेंटरचे गरज होती अनेक व्यक्तींचे वजन बाढले आहेत काही व्यक्तींचे वजन कमी आहेत त्यांचे वाढवणे गरजेचे आहे. त्यांच्यासाठी खूप मोठी सुवर्णसंधी आरोग्य सल्लागार नागेश औताडे यांनी उपलब्ध करून दिली आहे. यावेळी बोलताना विनोद आघाव म्हणाले की नागेश औताडे आणि आशाताई यांनी वजन कमी करून एक आदर्श निर्माण केला आहे. माजी आ. साठे बोलताना म्हणाले की नागेश औताडे यांनी वेलनेस च्या क्षेत्रात उडी घेऊन उत्तम निर्णय घेतला असल्याने त्यांचे अभिनंदन केले. राजकिशोर मोदी म्हणाले की नागेश पत्रकारितेत काम करत असताना हे वेगळे पाऊल उचलून वजन वाढलेल्या व्यक्तींना वजन कमी करण्यासाठीचे उत्तम मार्गदर्शन

करणार आहेत त्यांच्या या कार्याला शुभेच्छा दिल्या. डॉ. इंगोले म्हणाले की नागेश औताडे हर हुन्नरी व्यक्तिमत्व असल्याने मी त्यांना सतत वजन कमी करण्याचा सल्ला देत होतो. परंतु त्यांनी २३ किलो वजन कमी करून आपल्यासमोर एक उत्तम उदाहरण दिले आहे. कृष्णा बांगर सर म्हणाले की, नागेश औताडे व आशाताई या दोघांनी सुरू केलेल्या या वेलनेस सेंटरच्या माध्यमातून अनेक व्यक्तींचे वजन कमी करण्यास मदत होणार आहे. यावेळी व्यंकटेश चामनर, सुधाकर देशमुख, उमेश भाऊ पोखरकर, स्वप्निल सोनवणे संजय गंभीरे, जीवन दादा कराड, मनोज लखेरा यांनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक करताना कार्यक्रमाचे संयोजक नागेश औताडे यांनी सांगितले की, अनेक व्यक्ती फिरून वॉकिंग करून किंवा लिंबू पाणी पिऊन वजन कमी करण्यासाठी प्रयत्न करतात परंतु या ठिकाणी कुठलेही औषध न देता उत्तम व्यायाम, योग्य आहार व योग्य मार्गदर्शन दिले जाणार आहे. यामुळे प्रत्येकाचे वजन कमी होण्यास मदत होणार असून दररोज महिलांसाठी पुरुषांसाठी मुलांसाठी स्वतंत्र बॅच घेण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाचे आभार तालमणी प्रकाश बोरगावकर यांनी केले. यावेळी सर्व स्तरातील नागरिकांची मोठी उपस्थिती होती.



मा. आमदार संदीप भैय्या क्षीरसागर व माजी आमदार सय्यद सलीम यांच्या आदेशानुसार व शमू भैया व सद्दाम खान यांच्या नेतृत्वाखाली दिलावर पठाण व सरफराज पठाण व शेख मुस्ताक यांच्या सांगण्यावरून नवले शाळा ते मुनिरामजीद पर्यंत रस्त्यावर मुरूम टाकण्यात आले आहे जिथे नागरिकांना येण्या जाण्यासाठी त्रास सहन करावा लागत होता व शाळकरी मुलांना त्रासाला सामोरे जावे लागत होते त्या रस्त्यावर मुरूम टाकल्याबद्दल मा. आ. संदीप भैय्या क्षीरसागर साहेबांचे हार्दिक अभिनंदन

# पीडीतेला दिला न्याय आरोपीचा जामीन नामंजूर - ॲड. तेजस नेहरकर



बीड (प्रतिनिधी)

घटनेची हकीकत अशी की, पीडितेवर लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार करण्यात आला. त्या प्रकरणी तिच्या जवाबा वरून आरोपी नामे संतोष चिमाजी शिंदे रा. बीड सांगवी ता. आष्टी व एक महिला आरोपी यांच्या विरुद्ध आष्टी पोलीस स्टेशन तालुका आष्टी जिल्हा बीड येथे क्राईम नंबर १०३/२०२४ नुसार कलम ३६३, ३७६, ३७६ २ (ऋ) (ख) (छ) ३७६ (३) आयपीसी आणि ४, ६, १७ प्रोटेक्शन चिल्ड्रन फ्रॉम सेक्सुअल ऑफेन्स २०१२ अन्वये दिनांक १३/०३/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. व आरोपीला अटक करण्यात आली होती, आरोपीच्या विरुद्ध जिल्हा न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले, त्यानंतर आरोपीने जामीन अर्ज दाखल केला होता. त्या जामीन अर्जावर मा. न्यायालयात सुनावणी झाली सुनावणी दरम्यान ड. तेजस नेहरकर यांनी फिर्यादीच्या वतीने मांडलेली भक्कम बाजू व आरोपी विरुद्धचे पुरावे मा. न्यायालयासमोर निदर्शनास आनून दिले. त्यानुसार मा. न्यायालयाने आरोपीविरुद्धचा पुरावा पाहून आरोपीचा जामीन अर्ज नामंजूर केला आहे, फिर्यादीच्या वतीने ड. तेजस नेहरकर यांनी काम पाहिले व पीडितेला न्याय मिळवून दिला.

# कर्जमाफी, पिक विम्यासाठी शेकापचे पडत्या पावसात धरणे आंदोलन

तालखेड । प्रतिनिधी

पिक विमा न दिल्यास पालकमंत्र्याच्या हस्ते ध्वजारोहन होऊ देणार नाही .. भाई ड.नारायण गोले पाटील गेल्या दहा वर्षात शेतकऱ्यांची आणि शेतीची अवस्था प्रचंड वाईट झालेले असताना शासन शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून हक्काचा हमीभाव देखील देण्यास तयार नाही तसेच कर्जमाफीची घोषणा हवेतच विरली असून पिक विमा अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेला नाही याशिवाय लोकनेते सहकारी साखर कारखान्याने गेल्या दोन वर्षापासून शेतकऱ्यांचे पैसे दिलेले नसून संकटात सापडलेला शेतकरी कोंडीत पकडण्याचे पाप लोकनेते कारखाना प्रशासनाने केली आहे त्यामुळे शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला असून शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी झालीच पाहिजे, पिक विमा शेतकऱ्यांना तात्काळ मिळालाच पाहिजे, उसाचे गेल्या

दोन वर्षाचे राहिलेले पैसे तात्काळ शेतकऱ्यांचा खात्यात जमा झाले पाहीजे.. पि एम किसान यौजने पासुन वंचित शेतकर्यांचा सदर यौजनेत तत्काळ समावेश केला पाहीजे..शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारीत हमी भाव दिला पाहिजे बि-बियाणांच्या व खतांच्या वाढत्या किमती तात्काळ कमी झाले पाहिजे..माजलगाव तालुक्यातील सर्वच पांदन रस्त्याचे मुरुम- खडीकरण झाले पाहिजे., रुपा




माता गुळ कारखाण्या कडील थकीत बिले त्वरीत द्यावेत. कृषी विभागाकडे शेतकऱ्यांची थकीत असलेली सबसिडीची रक्कम त्वरित खात्यात जमा करा. कृषी कार्यालय, तहसील कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग येथे होणारी नागरिकांची हेळसांड थांबवा. विद्यार्थ्यासाठी विशेष बस सेवा सुरू करून विद्यार्थ्यांची हेळसांड थांबवा. जात प्रमाणपत्रे, नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्रे त्वरित वाटप करा. महा-ई-सेवा केंद्राकडून होणारी नागरिकाची लूट थांबून दर पत्रके लावा. मयत व्यक्तीच्या नावे केवायसी करून पैसे उचलणाऱ्या एस बी आय च्या अधिकाऱ्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करा.. या मागण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे राज्य मध्यवर्ती समिती सदस्य भाई ड.नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली माजलगाव उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर सकाळी दहा वाजल्यापासून चार वाजेपर्यंत पडत्या पावसात धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी कृषी अधिकार्या सह विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांना पिक विम्याच्या प्रश्नावर आंदोलकांनी चांगलेच धारेवर धरले तसेच शासनाने १५ ऑगस्ट पूर्वी पीक विमा शेतकऱ्यांच्या खात्यात जमा न केल्यास कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण होऊ देणार नाही असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे राज्य मध्यवर्ती समिती सदस्य भाई ड.नारायण गोले पाटील यांनी यावेळी केले,या आंदोलनाला माजी आमदार राधाकृष्ण अण्णा होके पाटील यांनी युवा नेते तन्मय भैया होके पाटील यांच्यासह पडत्या पावसात उपस्थित राहून पाठिंबा दिला तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा अल्पसंख्यांक कार्याध्यक्ष नुमानभाई चाऊस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष मनोहर डाके, मुंजाभाऊ घायतिडक यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला तर यावेळी भाई मुंजा पांचाळ, भाई अनंत चव्हाण, भाई गणपत आप्पा कोळपे,भाई विष्णू शेळके, भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण, भाई राहुल सोळंके, भाई चांगदेव शेजुळ, भाई माऊली चंदनशिव, भरत सोळंके, राजेभाऊ शेरकर, माऊली गडदे, शिवाजी हांडे, उमाजी वैद्य,भास्कर कांबळे, जयराम राऊत, अशोक सोळंके सर, बालासाहेब शिंदे, राजेश्वर मोरे, नीलाराम टोळे, श्रीराम कोरडे, महमूद पटेल, श्रीराम शेळके, विलास जावळे, सिद्धेश्वर काळे, दिलीप वानखेडे, गणेश रामभाऊ काळे, धनराज सावंत, बाबासाहेब कदम, योगेश गोपाळ, लक्ष्मण काळे, ज्ञानेश्वर शिंदे, राजेश डाके बाबुराव पोळ, नामदेव शेरकर यांच्यासह शेकडो शेतकरी बांधव उपस्थित होते .



## पत्रकारितेचा सहावा पुरस्कार आणि वृक्षारोपण केल्याबद्दल एस.एम.युसूफ यांचा सत्कार

बीड (प्रतिनिधी) – गेल्या दहा वर्षापासून मुक्तपत्रकारिता करत असलेले एस.एम.युसूफ यांना दैनिक प्रभास केसरी कडून नुकतेच आदर्श पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पत्रकारिता क्षेत्रातील कार्याबद्दल त्यांना हा सहावा पुरस्कार मिळाला तसेच रस्त्यालगत वृक्षारोपण केल्याबद्दल बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांकडून शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कारित करण्यात आले.

हा छोटेखानी सत्कार साप्ताहिक द स्कूल एक्सप्रेस च्या कार्यालयात करण्यात आला. यावेळी मुख्यसंपादक शेख एजाज, राष्ट्रीय काँग्रेस पक्ष ओबीसी सेलचे शहराध्यक्ष सय्यद फरहान, शेर-ए-हिंद ग्रुप ऑफ महाराष्ट्राचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा काँग्रेस कमिटी निराधार निराश्रित व्यक्ती विकास विभागाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष शेख आमेर पाशा, ओबीसी सेल बीड शहर उपाध्यक्ष शेख नाजेद हमदान, नाथ शक्ती संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनील धायडे, अब्दुल जब्बार मोमीन, शहानवाज यांची प्रमुख उपस्थिती होती.

# श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये उद्यापासुन बाळनाथ महाराजांच्या पालखी सोहळ्यास सुरुवात

बीड । प्रतिनिधी

प्रति वर्षाप्रमाणे विसाव्या शतकातील महान संत विभूती वै. ह भ प ज्ञानेश्वर माऊली महाराज श्रीक्षेत्र चाकरवाडीकर यांच्या कृपाशीर्वादाने चालत आलेला अखंड हरिनाम सप्ताह व गुरुवर्य तपोनिधी बाळनाथ महाराज पालखी सोहळा सोमवार दि. १२ ऑगस्ट २०२४ ते सोमवार दिनांक १९ ऑगस्ट २०२४ पर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दिनांक १९ ऑगस्ट २०२४ सकाळी ९ वाजता श्री बाळनाथ महाराज यांचे पालखी मिरवणूक होणार आहे. कलश पूजन व दीप प्रज्वलन व सप्ताह प्रारंभ श्री ह भ प तपोनिधी शांतीब्रह्म गुरुवर्य महादेव महाराज तात्या बाळनाथ माऊली संस्थान श्रीक्षेत्र चाकरवाडी यांच्या हस्ते होईल. तसेच दररोज सकाळी पहाटे ४ ते ६ काकडा भजन सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण १० ते बारा१२ गाथा भजन ४ ते ५ ज्ञानेश्वरी प्रवचन ५ ते ६ हरिपाठ रात्री ८ ते १० हरिकीर्तन आणि १० ते ३ संगीत भजन व जागर अशा प्रकारचे कार्यक्रम दैनंदिन रूपरेषेमध्ये पार पडणार आहेत. चालत असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये आठ दिवस महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार यांचे कीर्तन रात्री ९ ते ११ या वेळेमध्ये होणार आहेत. तरी सर्वांनी होणाऱ्या कीर्तन श्रावणाचा लाभ घ्यावा.

दि. १९ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ९ वाजता पालखी मिरवणुकी सुरुवात होईल. श्री बाळनाथ महाराजांच्या पालखी विसर्जनानंतर महाप्रसाद होईल. तरी



या सर्व होणाऱ्या कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन सर्व ग्रामस्थ मंडळी श्री क्षेत्र चाकरवाडी आणि तपोनिधी गुरुवर्य महादेव महाराज तात्या यांनी केले आहे. तसेच सायंकाळी ५ ते ८ या वेळेमध्ये गुरुवर्य तपोनिधी महादेव महाराज तात्या यांचे काल्याचे किर्तन होईल. सप्ताह मधील सर्व कार्यक्रम श्री ह भ प महादेव महाराज तात्या बाळनाथ माऊली संस्थान श्री शेत्र चाकरवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहेत. वरील सर्व कार्यक्रमाचा लाभ घेण्याच्या आवाहन समस्त गावकरी मंडळी श्रीक्षेत्र चाकरवाडी आणि श्री ह भ प महादेव महाराज तात्या यांनी केले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज स्मारक उभारण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केले धरणे आंदोलन

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : दि ९ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती च्या वतीने स्मारक उभारण्यासाठी च्या कामातील अडथळा दूर करण्यासाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालया समोर धरणे आंदोलन करण्यात आले . गेवराई शहरात छत्रपती चौकात स.न ५८ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज स्मारक व्हावं अशी मागणी मागील दोन वर्षांपासून गेवराई शहर व तालुक्यातील जनता शासनाकडे करीत आहेत.परंतू प्रस्तावित जागेवर भूमाफियांनी दावा केल्याने त्यांच्या दबावाखाली शासन रितसर परवानगी दिली नाही.रितसर परवानगी तात्काळ द्यावी, भूमाफिया वर एम पी डी ए अंतर्गत कारवाई करावी, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक उभारण्यासाठी उशीर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी इत्यादी मागण्यांसाठी धरणे आंदोलन करण्यात आले.आंदोलनाला शिव संग्राम, भारतीय मराठा महासंघ,अखिल भारतीय




मराठा महासंघ, राष्ट्रीय जावा संघटना,पँथर्स रिपब्लिकन पार्टी,अ.भा.भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समिती,सकल जैन समाज गेवराई, स्वाभिमानी शेतकरी संघटना,शिवभक्तांची युवा परिषद, डॉक्टर संघटना यांनी जाहीर पाठिंबा देवून आंदोलनात सक्रिय सहभागी होण्याचा इशारा दिला.त्याच बरोबर आंदोलनात छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती चे अध्यक्ष ड संजय काळे, उपाध्यक्ष श्यामराव गायकवाड, सचिव कैलास राव माने, डॉ अनिल दाभाडे, विलास खिसाडे, विनोद अप्पा इंगोले, सुहासराव पाटील, कैलास तळेकर, राजाभाऊ तेलुरे, माउली नवले,दुर्गेश यादव,शिवाजी राव सोळुंके,ड अंबादास राव जाधव,शहीन पठाण,प्रभाकर भालशंकर,कवळे, लांडगे, डॉ धुमाळ, बापुसाहेब जाधव,सुशिल टकले,कुलदीप करपे, भालचंद्र तिकीट, भाऊराव प्रभाळे,लहु गायकवाड यांच्या सह शहरातील, तालुक्यातील मावळे,विविध गावचे सरपंच ,आजी माजी ग्रामपंचायत सदस्य, पत्रकार, प्राध्यापक, डॉक्टर, वकील, सामाजिक व राजकीय व्यक्ती सह हजारो मावळे आंदोलनात सहभागी झाले होते.त्याच बरोबर डॉ ज्योती ताई मेटे व माजी मंत्री सुरेश राव नवले साहेब यांनी आंदोलनास प्रत्यक्ष भेटून पाठींबा दिला .आंदोलन रात्री ८ वाजेपर्यंत सुरू होते मा. जिल्हाधिकारी साहेब यांचे बरोबर चर्चा त्यांच्या दालनात होउन पुढील कार्यवाही सोमवारी करण्याचा शब्द मा जिल्हाधिकारी साहेबांनी दिला. त्यामुळे छत्रपती स्मारक समिती ची पुढील भूमिका सोमवारी सायंकाळी ठरवण्यात येईल असे ठरवण्यात आले. सर्व मावळ्यांनी आंदोलनात शांततेत सहभागी झाल्याबद्दल मावळे ,पाठबळ देणाऱ्या सर्व संघटना यांचे छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती च्या वतीने ड संजय काशिनाथराव काळे अध्यक्ष छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती गेवराई यांनी आभार मानले.

# गेवराई तालुक्यातील तळणेवाडी, भोजगावात चोरट्यांचा धुमाकूळ

## शास्त्रांचा धाक दाखवत तीन ठिकाणी घरफोडी

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील तळणेवाडीतील अंगणवाडी सेविकेचे सोमवारी (दि. ५) दिवसाढवळ्या घर फोडले होते. ही घटना ताजी असताना शुक्रवारी (दि. ९) रात्री ११. १५ वाजता तळणेवाडी अंतर्गत शेवगाव उमापूर मुख्य रस्तालगट असलेल्या ऐउकेच्या शेतवस्तीवर शस्त्रास्त्राचा धाक दाखवत दरोडा टाकला. यावेळी मेन गेटचे कुलूप तोडून चोरट्यांनी मारहाण करत सोन्याचे दागिने लांबविले. तर भोजगाव येथेही चोरट्यांनी ५ ते ६ तोळ्यांचे सोने लुटून नेले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चाकूचा धाक दाखवत चोरीभोजगाव येथील दिनकर संत यांच्या घरी चाकूचा धाक दाखवत चोरी झाली. रात्रीत



दोन ठिकाणी घरफोडी करून जवळपास ५ ते ६ तोळ्यांचे दागिने चोरले. यावेळी ऐडके वस्ती येथे चोरट्यांची आणि घर मालकामध्ये झटापटी झाली. तळणेवाडी येथील उमर रियाजोद्दिन काजी व संतोष पवार यांच्या घरात चोरट्यांनी चोरी केली. यावेळी रोख रक्कम व सोन्याच्या दागिन्यांवर हात साफ केला. ४ लाखांचे सोने आणि रोकड चोरट्यांनी पळविली.

पोलिसांनी श्वान पथकाला पाचारण केले. परंतु श्वान परिसरातच घुटमळल्याने माग निघू शकला नाही.

पोलिसांनी गस्त घालण्याची मागणी

वाढत्या चोरीच्या घटनांमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यांचा बंदोबस्त करण्यात पोलिसांना यश आलेले नाही. याबाबत सरपंच अविनाश धस यांनी गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रविणकुमार बांगर यांना निवेदन देऊन रात्री पोलिसांची गस्त घालण्याची मागणी केली आहे. तसेच अवकाशात ड्रोन फिरविण्यासाठी पोलिसांची परवानगी आहे का ? याची माहिती घेऊन त्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली.

गावामध्ये महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवा. ग्रामसुरक्षा दलाची स्थापना करा. त्यांना आयडेंटी कार्ड देऊ. तुम्हाला पोलिसांचे सहकार्य राहील. संशयास्पद काही आढळल्यास आम्हाला कळवा. पोलीस प्रशासन तुम्हाला सहकार्य करेल.

-प्रविणकुमार बांगर, पोलीस निरीक्षक, गेवराई

# तलवाडा ग्रामपंचायत अंतर्गत पवारमळ तांडा, चाहूर तांडा, गौंडगाव तांड्याला जाणाऱ्या रस्त्याची दुरावस्था

## नायक युथ फाउंडेशनचे लेखी निवेदन : उपोषणाचा इशारा?

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : गेवराई मतदारसंघात दर्जेदार रस्त्याचे जाळे विणणारे म्हणून कार्यसम्राट आमदार लक्ष्मण पवार यांची ओळख आहे. परंतु त्यांच्याच मतदारसंघातील काही गावांना येण्या-जाण्यासाठी रस्ता नाही. यामुळे गावातील नागरिक संतप्त झाले आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाले, परंतु गेवराई तालुक्यातील अनेक गावांना, तांड्यांना येण्या जाण्यासाठी जोड रस्ता नाही. तलवाडा ग्रामपंचायत अंतर्गत पवारमळ तांडा, चाहूर तांडा, गौंडगाव तांडा या तांड्यावरील नागरिकांना रस्ता नसल्यामुळे मोठी कसरत करावी लागत आहे. तसेच अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. रस्ता नसल्याने वाहने येत नाही. बरोबर रस्ता नसल्यामुळे शाळेत जाण्यासाठी विद्यार्थ्यांना कसरत करावी लागत आहे. तसेच आजारी रुग्णांना, डिलेव्हरी पेशंटला हॉस्पीटलला नेण्यासाठी सोय नसल्यामुळे अनेक रूग्णांना रस्त्यावरच जीव गमावल्याच्या घटना देखील घडलेल्या आहेत. ही अतिशय गंभीर बाब समोर आली आहे.

गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या पवारमळ तांडा, चाहूर तांडा, गौंडगाव तांडा सदरील या तांड्यांना तातडीने जोड रस्ता तयार करून हा प्रश्न मार्गी लावावे, अशी मागणी नायक युथ फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे. या दोन्ही तांड्याना जोडणाऱ्या रस्त्याची दुरावस्था झाली असून, चार किलोमीटर अंतराचा रस्ता हा पावसामुळे चिखलमय होऊन चिखलाचे साम्राज्य झाले आहे. रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले असल्याने वाहनधारकांना तारेवरची कसरत करत जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. संबंधित विभागाने वेळीच लक्ष घालून रस्त्याची दुरूस्ती करण्याची मागणी ग्रामस्थांतून होत आहे. रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले असून संबंधित विभागाचे याकडे




दुर्लक्ष होत आहे. दळणवळणासाठी हा प्रमुख रस्ता असल्यामुळे नागरिकांना उद्योग, व्यवसाय, शाळा, नौकरी, रूग्णालय, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी या रस्त्यावरून प्रवास करावा लागतो. अशा या खड्डेमय झालेल्या रस्त्यावरून जीव मुठीत घेत जीवघेणा प्रवास करावे लागत असून, रात्रीच्या वेळी खड्ड्यात दुचाकीस्वार गाडीवरून पडून जखमी होत आहेत. तसेच होणारा नाहक त्रास सहन करीत जीवघेणा प्रवास करावा लागत असल्याने वाहन चालक व नागरिकांतून नाराजी दिसून येत आहे. संबंधित विभाग, लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष घालून रस्ता दुरुस्त मागणीचे लेखी निवेदन नायक युथ फाउंडेशनच्या वतीने गेवराई तहसीलदार मार्फत जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. नसता दि.२० ऑगस्ट रोजी गेवराई पंचायत समितीसमोर उपोषण करण्याचा इशारा नायक युथ फाउंडेशनने दिला आहे.

# बीड मनसे राज्यात गरुडझेप घेईल-राज ठाकरे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा महाराष्ट्र नवनिर्माण सेना ही राज्यात गरुडझेप घेईल व राज्याच्या राजकारणात वेगळीच छाप पाडेल असे कौतुक करुन राज ठाकरे यांनी दि.९ ऑगस्ट २०२४ रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेना शहर मध्यवर्ती कार्यालयाचे शहरातील नगर नाका, कॅनॉल रोडवरील कार्यालयात केले तसेच अत्यल्प दरात रुग्णवाहिका सेवेच उद्धाटन त्यांनी केले.

मनसेचे करण लोंढे, सोमेश कदम, ऋषिकेश गिराम यांच्या संकल्पनेतून उभारलेले कार्यायाचे उद्घाटन राज ठाकरे यांनी केले समवेत मनसेचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी राज ठाकरे म्हणाले की, ज्या प्रकारे तरुणाई वर्ग मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र नवनिर्माण



सेनेत पक्ष प्रवेश करत आहे हे पाहता येणार्या काळात बीड जिल्ह्यात मनसे भरारी घेईल तसेच प्रश्न जिथे जनतेचा, मार्ग तिथे मनसेचा हे ब्रीद सोबत घेवून महाराष्ट्र नवनिर्माण घडवावे असे ते म्हणाले यावेळी. मनसेचे जिल्हा, तालुका पदाधिकारी, महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



औरंगाबाद येथे AIMIM महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष तथा मा खा. इम्तियाज जलील साहेब यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतांनी AIMIM बीड जिल्हा अध्यक्ष ड शेख शफीक भाऊ यावेळी औरंगाबाद के मा. जिल्हा अध्यक्ष समीर साजीद बिल्डर, युवा नेते कलीम भाई, सय्यद सैफअली लालु, मजलेगाव तालुका अध्यक्ष इद्रिस पाशा,उ-शेख अजीज, AIMIM मराठवाडा सोशल मीडिया एडमिन शेख मुदस्सिर, शेख समीर,सय्यद अमान , अनसार भाई आणि AIMIM बीड जिल्हा पदाधिकारी, कार्यकर्त उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT